**CNR NO-MHSO06-000760-2020** | **नियमित दिवाणी दावा क्र.८५/२०२०**

**अंबादास रंगनाथ भुसनर.**
**वि.**
**महाराष्ट्र सरकार व इतर.**

## नि. ४७ वरील आदेश
## (घोषित दि. १४/०७/२०२२)

०१] प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करीता दाखल करण्यात आलेला आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी क्र. ७ ते १९ यांनी दि.१९.०४.२०२१ रोजीच्या बेकायदेशीर साठेखताच्या आधारे दि.१७.०२.२०२२ रोजी बेकायदेशीर खरेदीखत अस्तीत्वात आणलेले आहे व त्याव्दारे प्रतिवादी क्र. ८ ते १९ यांना मालकी हक्क प्राप्त झाले असे दर्शविण्याचा प्रयत्न करीत आहेत. सदरचे खरेदीखत दाव्याचे कामकाज सुरु असताना अस्तीत्वात आले आहे त्यामुळे ते खरेदीखत बेकायदेशीर असून वादीच्या हक्कावर बंधनकारक नाही अश्या स्वरुपाची दुरुस्ती परिच्छेद क्र. ८ ब व्दारे करुन दाव्यातील विनंती कलमामध्ये परिच्छेद क्र. ११ उ मध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी मागण्यात आली आहे. एकुणच दाव्याचे परिच्छेद क्र. ८ अ नंतर ८ ब व ११ उ मध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मागितली असून सदरची दुरुस्ती केल्यास दाव्याचे स्वरुप बदलणार नाही. सदर दुरुस्ती दावा सुरु असताना झालेल्या घटनांमुळे आवश्यक असून दुरुस्तीची परवानगी देण्यास विनंती करण्यात आलेली आहे.

०२] प्रतिवादीतर्फे सदर अर्जास प्रखर विरोध करुन तथा प्रस्तुत दुरुस्तीमुळे दाव्यामध्ये बदल होत असून अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

०३] माझे समोर पुढील मुद्दे उपस्थित होतात त्यावर माझे असलेले निष्कर्ष व त्याकरीता असलेली कारणमिमांसा खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी दाव्यात दुरुस्ती होवून मिळणेस पात्र आहे काय ? | होय |
| २. | अंतिम आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात आला. |

कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ बाबतः–**

०४] प्रस्तुत दाव्यामध्ये नि.क्र. १६ नुसार प्रतिवादी क्र. ६ ते १९ यांना दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० प्रमाणे प्रतिवादी म्हणून सामील करण्यात आले होते. दि.१९/०४/२०२१ रोजी साठेखताचे दस्त प्रतिवादी क्र. ७ ते १९ यांनी अस्तीत्वात आणलेला आहे असे दिसून येते की, ज्या दस्ताच्या आधारे दि.१७/०२/२०२२ रोजी नोंदणीकृत खरेदीखत क्र. ५६७/२०२२ असे अस्तीत्वात आलेले आहे. वादीने सदरचे खरेदीखत नोंदविण्याचा प्रतिवादी क्र. ७ ते १९ यांना कोणताही हक्क व अधिकार नसल्याचे नमूद करुन आलेले खरेदीखत अव्हानीत केलेले आहे. निश्चितपणे प्रस्तुतचे खरेदीखत दाव्याचे कामकाज सुरु असताना अस्तीत्वात आलेले असून ते खरेदीखत दावा मिळकतीबाबत आहे. प्रस्तुतचा दावा हा जाहीर ठरावाबाबत असून अश्या परीस्थीतीमध्ये वादी विनंती केल्यानुसार दुरुस्ती करुन मिळण्यास पात्र असल्याचे माझे मत झाले आहे. प्रस्तुतची दुरुस्ती ही दावा गुणदोषांवर निकाली काढण्याकरीता आवश्यक असून ती मंजूर केल्यास प्रतिवादींवर कोणताही अन्याय होणार नाही. उलटपक्षी सदर दुरुस्ती नामंजूर केल्यास वादीचे अतोनात नुकसान होणार आहे. सबब, वादी दाव्यात दुरुस्ती करुन मिळण्यास पात्र असल्याचे माझे मत झाले आहे. करीता मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देतो.

**मुद्दा क्र. २ बाबतः–**

०५] वरील सर्व विवेचनावरुन प्रस्तुत अर्ज मंजूर करणे योग्य असल्याचे माझे मत झाले आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१ अर्ज मंजूर करण्यात येतो.

२ वादीने विहीत मुदतीत दाव्यात दुरुस्ती करावी व पुढील तारखेपावेतो दुरुस्त प्रत सादर करावी.

३ खर्च मुळ दाव्यात.

AMIT ASHOKRAO KHANDALE

Digitally signed by AMIT ASHOKRAO KHANDALE Date: 2022.07.14 15:14:57 +0530

दि.१४/०७/२०२२.

(अमित अ.खंडाळे)
२रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
पंढरपुर.
**J.O.CODE-1828**

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per the original order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Employee | : | Shirsikar V. G., Stenographer |
| Court | : | 2nd Jt. C.J.S.D. Pandharpur |
| Date | : | 14.07.2022 |
| Judgment/order signed by the Presiding Officer on | : | 14.07.2022 |
| Judgment/Order uploaded on | : | 14.07.2022 |